# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जत (जि. सांगली) तालुक्यातील उमटी पोलीस स्टेशनमध्ये मृत बाबर यांच्या खुनाच्या गुन्हाचा तपास पूर्ण झाला नसल्याबाबत

**(१) २८१६६ (२१-०१-२०१६). श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि. सांगली) तालुक्यातील उमटी पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं.४५/२००९ भा.द.वि.स कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल झालेला असताना देखील मृत बाबर यांच्या खुनाचा तपास अद्यापपर्यंत पूर्ण झाला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माजी आमदार व त्याचे कुटुंबियांचा विरोधात आरोप झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राजकीय दबावामुळे चौकशीसाठी विलंब होत असल्याची तक्रार मृत बाबर यांच्या कुटुंबियांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी सध्या कुठल्या स्तरापर्यंत पोचली आहे,

(६) नसल्यास, मृत बाबर यांच्या गृन्ह्याची चौकशीसाठी विलंबाची नेमकी कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय, परंतु सदर तक्रार अर्जाची सखोल चौकशी करण्यात आली असुन त्यात तथ्यता दिसून येत नाही.

(४) सदर प्रकरणी दि. ०३/०९/२००९ रोजी उमदी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४५/२००९ भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्यात एक संशयीत आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपीविरूध्द ठोस पुरावा मिळाला नसल्याने मा. न्यायालयाकडून त्यांना जामीन मिळाला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(२) ३१२६२ (१७-११-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात मोठ्या प्रमाणातअवैध धंदे सुरु असल्यामुळे नागरिकांना अतिशय त्रास सहन करावा लागत असून पोलीसांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ्या प्रमाणात सुरु असलेले अवैध धंदे बंद करण्याबाबत तसेच अवैध धंदे करणा-यांकडे दुर्लक्ष करणा-या पोलीसांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) हे खरे नाही,

हिंगोली पोलीस दलाकडून कळमनुरी तालुक्यात चोरुन लपून चालणाऱ्या अवैध धंद्याची माहिती काढुन वेळोवेळी अवैध धंद्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. ऑगस्ट, २०१५ मध्ये जुगाराच्या ३ केसेस व दारुबंदीच्या ५ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच २०१५ अखेर जुगाराच्या ३५, दारुबंदीच्या १५७, गुटखा संबधी २ केसेस दाखल करुन अवैध धंद्यास आळा घालण्यात आला आहे. तसेच ५२ गुन्हेगारांवर हद्दपारीच्या केसेस करण्यात आल्या आहेत.

(२) अवैध धंद्यास आळा घालण्यात असमर्थ असणाऱ्या दोन बिट जमादारास पोलीस मुख्यालय येथे संलग्न करण्यात आले असून त्याची खात्याअंतर्गत चौकशी चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहरात यामनी चीटफंड कंपनीने शहरातील अनेक लोकांची फसवणूक केल्याबाबत**

**(३) ३४४५५ (२१-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहरात २ वर्षापूर्वी सुरू झालेल्या यामनी चीटफंड कंपनीने शहरातील अनेक लोकांना जास्त वाढ व्याज देण्याचे आमिष दाखवून लाखो रूपये गोळा करुन तेथील लोकांची फसवणूक केल्याबाबत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच फसवणूक झालेल्या लोकांना रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १९१/२०१५ भा.दं.वि. कलम ४१८, ४२०, ३४ प्रमाणे दि. ०१/०८/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्यात एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आलेले आहे. तसेच १ आरोपी फरार असल्याने त्याचा शोध घेण्यास सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

अटक आरोपींना ८ दिवसाची पोलीस कोठडी मिळाली असुन दि. ०१/१०/२०१५ रोजी मा. न्यायालयाने त्यांना जामीनावर सोडले आहे. तसेच १ फरार आरोपीचा शोध घेण्यावर सदर गुन्हा प्रलंबित आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## गोंडखेळ (ता.जामनेर, जि.जळगांव) येथे पोलिस अधिकाऱ्यांनी वन्य प्राण्यांच्या शिकाऱ्यांना पकडल्याबाबत

**(४) ३५८५३ (२१-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडखळ (ता.जामनेर, जि.जळगांव) येथील साखर कारखान्यांजवळ स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांनी दिनांक १ मे, २०१५ रोजीच्या सुमारास वन्य प्राण्यांच्या शिकाऱ्यांना पकडले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच वन्य प्राण्यांची शिकार रोखण्याकरिता कोणत्या विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

गोंडखेळ साखर कारखान्यालगत दिनांक १ मे, २०१५ रोजीचे रात्री पकडण्यात आलेले इसम वन्य प्राण्यांची शिकार करणारे शिकारी नसून ते अवैध शस्त्रसाठा कब्जात बाळगणारे तथा स्वत:चे कब्जातील वाहनावर महाराष्ट्र शासन असे नमुद असलेले स्टीकर लावून सरकारी नोकर असल्याचे भासविणारे गुन्हेगार आहेत. त्यांना स्थानिक पोलीसांनी अटक केलेली आहे.

(२) या गुन्ह्यामध्ये ६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचे विरुध्द दि.०२/०५/२०१६ रोजी जामनेर पोलीस ठाण्यात भाग-५ गु.र.नं.७३/२०१५ भा.दं.वि. कलम १७० सह आर्म ॲक्ट कलम ३, ४/२५ नुसार रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींना न्यायालयाने जामीनावर सोडले आहे. सदर प्रकरणी दि.१७/०८/२०१५ रोजी न्यायालयात दोषारोप पत्र क्र.६६/२०१५ अन्वये खटला दाखल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील विविध विभागातील असलेल्या रिक्त पदांबाबत

**(५) ३७८४७ (२९-१२-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील विविध विभागात मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य, बांधकाम, जिल्हाधिकारी कार्यालय, जी .प . कार्यालय आदी विभागात पदे रिक्त आहेत काय,

(३) असल्यास, रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे

(३) व (४) गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत आवश्यक त्या उपाय योजना करण्याबाबतच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २६.१०.२०१६ च्या पत्रान्वये सर्व संबंधीत प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत

---

## आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) या तालुक्यात मोठया प्रमाणात घडलेल्या चोऱ्या व दरोडयाच्या घटनेबाबत

**(६) ३८८४७ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) या तालुक्यात सन २०१४-२०१५ मध्ये मोठया प्रमाणावर चोऱ्या व दरोडयाच्या घटना घडलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चोऱ्या व दरोडयांच्या गुन्हयात सहभागी असलेल्या आरोपींना पकडण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१६) :** (१) आष्टी उपविभागात अंबोरा, पाटोदा, अंमळनेर व शिरुर या ५ पोलीस ठाण्याचा समावेश आहे. या उपविभागात सन २०१४ मध्ये दरोडा या सदराखाली २ गुन्हे असुन दोन्ही गुन्हे उघडकीस आणलेले असुन त्यात १६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच सन २०१५ मध्ये २ गुन्हे दाखल असुन दोन्ही गुन्हे उघडकीस आलेले असुन त्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सन २०१४ व २०१५ या वर्षात दरोड्याच्या दाखल गुन्ह्यांची तुलना करता त्यात वाढ झालेली नाही.

सन २०१४ मध्ये जबरी चोरी या सदराखाली ६ गुन्हे असुन त्या पैकी ४ गुन्हे उघडकीस आले असुन त्यात ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सन २०१५ मध्ये १२ गुन्हे दाखल असुन त्यापैकी ८ गुन्हे उघडकीस आले असुन त्यात १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सन २०१४ व २०१५ या वर्षात दाखल गुन्ह्यांची तुलना करता सन २०१५ मध्ये ६ गुन्ह्यांची वाढ झाली आहे.

सन २०१४ मध्ये घरफोडी या सदराखाली ३४ गुन्हे असुन त्यापैकी ११ गुन्हे उघडकीस आले असुन त्यात २७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सन २०१५ मध्ये २९ गुन्हे असुन त्यापैकी ९ गुन्हे उघडकीस आले असुन त्यात १५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सन २०१४ व २०१५ या वर्षात घरफोडीच्या गुन्ह्यांची तुलना करता सन २०१५ मध्ये 5 गुन्ह्यांची घट झालेली आहे.

सन २०१४ मध्ये चोरी या सदराखाली ६७ गुन्हे असून १३ गुन्हे उघडकीस आणलेले असून ४३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच सन २०१५ मध्ये चोरी या सदराखाली ८५ गुन्हे असून २७ गुन्हे उघडकीस आणलेले असून २५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सन २०१४ व २०१५ या वर्षात जबरी चोरीचे दाखल गुन्ह्यांची तुलना करता सन २०१५ मध्ये १८ गुन्ह्यांनी वाढ झालेली आहे.

आष्टी, अंभोरा, पाटोदा, अंमळनेर व शिरुर येथील मालाविरुध्द गुन्ह्याचा आढावा घेता सन २०१४ मध्ये चोरीचे एकुण १०९ व सन २०१५ मध्ये १२८ गुन्हे दाखल असुन १९ गुन्ह्याची वाढ झाली आहे.

(२) सन २०१४ मध्ये ९३ व सन २०१५ मध्ये ६० आरोपींना अटक करुन त्यांचेकडून गुन्ह्यातील माल हस्तगत करुन सबळ पुरावा गोळा करुन मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे. तसेच उर्वरित आरोपींचा शोध घेवून त्यांना निष्पन्न करुन माल हस्तगत करण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर विशेष पथक स्थापन करुन गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न चालु आहेत. तसेच जिल्हा स्तरावर स्थानिक गुन्हे शाखा व दरोडा प्रतिबंध पथका मार्फत आरोपीचा शोध घेणे चालु असून गुन्हे उघडकीस आणण्याचे कसोशिने प्रयत्न चालु आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

## निमझरी (ता.अमळनेर, जि. जळगांव) येथील तलाठी, कृषिसहायक व अन्य दोन जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केल्याबाबत

**(७) ३९१०७ (२१-०१-२०१६). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमझरी (ता.अमळनेर,जि. जळगांव) येथील तलाठी, कृषिसहायक व अन्य दोन जणांवर दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस पंचनामे करुन शासनाने मंजूर केलेले अनुदान दुस-याच्या नावावर देण्याचा आरोप या चार जणांवर आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे पण खरे आहे.

(३) सदर प्रकरणी ४ आरोपींविरुध्द अमळनेर पो.स्टे. भाग ५ गु.र.नं. १११/२०१५ भा.दं.वि. कलम १६७, ४२०, ४६७, ४६८, २०१, ३४ प्रमाणे दि. १७/०८/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन तपासावर आहे. गुन्ह्यातील सर्व आरोपींना न्यायालयाकडून दि.२६/०८/२०१५ रोजी अटकपुर्व जामिन मंजुर करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## वसई (जि.पालघर) येथील अनधिकृत बांधकामाबाबत

**(८) ४०२३८ (२०-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगणमताने अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात वाढ झाली असून सहायक आयुक्त स्मिता भोईर यांच्या विरोधात बेकायदेशीर बांधकामांना संरक्षण दिल्याप्रकरणी माहे जानेवारी २०१६ वा त्या सुमारास वसई पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे स्मिता भोईर यांच्या गैरव्यवहार व बेकायदेशीर कामांविरोधात श्री. धनंजय गावडे यांनी सादर केलेल्या तक्रारीमधील प्रमुख बाबी कोणत्या आहेत ,

(३) तसेच स्मिता भोईर यांनी सन २०१० व २०१५ कालावधीत नालासोपारा, नवघर, माणिकपूर, वसई गाव इ. विभागीय कार्यालयात काम केलेल्या कार्यकाळात ५३५ बेकायदेशीर बांधकामाविरुध्द एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :** (१) होय, सदरहू प्रकरणी वसई पोलीस ठाणे गु.र.नं. ०६/२०१६ भा.दं.वि.स.कलम ४२०,४६५,४६६,४६८,४७१,४७२ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, सदर अर्जात सहाय्यक आयुक्त श्रीमती स्मिता भोईर, आपले अर्थिक हितसंबंध जपण्याकरिता बांधकाम अधिकृत ठरवून महानगरपालिकाची फसवणुक तसेच ठाणे अंमलदार वसई असा बनावट शिक्का तयार करुन त्याचा वापर करुन बनावट पत्र खरे आहे, असे भासवनू स्वत:चे बचावाकरीता वसई विरार शहर मनपा यांना सादर करुन सदर पत्र वसई पोलीस ठाणे येथे दिले आहे अशी खोटी माहिती दिली म्हणून त्यांना तात्काळ निलंबीत करुन त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्यात यावी या प्रमुख बाबी आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हयांचे प्रमाण वाढले असल्याबाबत**

**(९) ४०५४३ (२०-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि. अहमदनगर) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हयांच्या संख्येत यावर्षी वाढ झालेली असून अनेक महत्वाचे गुन्हे पोलीसांना उघड करता आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हयाचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीत सन २०१५ मध्ये माहे मे अखेर १२६ गुन्हे दाखल असून सन २०१६ मध्ये मे अखेर १२९ गुन्हे दाखल आहेत. सन २०१५ च्या तुलनेत सन २०१६ मध्ये ३ गुन्ह्यांची नगण्य वाढ झालेली आहे. सन २०१६ मध्ये (दि.३१/०५/२०१६ अखेर) दाखल खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, दंगा, दुखापत, बलात्कार, विनयभंग यासारखे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

(२) गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी रात्रगस्त, नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन, रेकॉर्डवरील गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करणे इत्यादी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**श्रीराम शिक्षण संस्थेच्या (ता.माळशिरस, जि.सोलापूर) स्कूल बसचा झालेला अपघात**

**(१०) ४११७० (२०-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीराम शिक्षण संस्थेच्या (ता.माळशिरस, जि.सोलापूर) स्कूल बसला दिनांक २० ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास अपघात होवून २ विद्यार्थी ठार तर ६ विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मृत झालेल्या मुलांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना कोणती आथिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकरणी माळशिरस पोलीस ठाणे येथे गु.र.नं.११६/१५ भा.दं.वि.कलम २७९, ३०४(अ),३३७, ३३८, ४२७ सह मो.व्ही. ॲक्ट क्र.१८४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील दोन्ही वाहनचालकास अटक करुन न्यायालयासमोर हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस जामिन मंजूर केला आहे. अपघातातील मृत व जखमी विद्यार्थ्याच्या कुटुंबियांना मोटार अपघात न्यायाधिकरणात नुकसान भरपाई दावा दाखल करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे पुरविण्यात आलेली आहेत. तसेच गुन्ह्याची चौकशी पूर्ण करुन आरोपी विरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले असुन सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**लातूर जिल्ह्यात वाहनचोरी, घरफोडी, दागिने हिसकावणे, दरोडे, खून, विनयभंग यांसारख्या गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत**

**(११) ४१६२८ (२०-०५-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात वर्षभरात वाहनचोरी, घरफोडी, दागिने हिसकावणे, दरोडे, खून, विनयभंग यांसारख्या गुन्ह्यांच्या वाढत्या संख्येमुळे गुन्हेगारी तसेच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शहरातील चौकाचौकात बसवलेली सी. सी. टीव्ही यंत्रणा देखील बंद असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुन्हे रोखण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यात मे, २०१६ अखेर खुन-१६, दरोडा-३, चैन स्नॅचिंग-७, घरफोडी-६६, वाहनचोरी-११२, विनयभंग-६२ गुन्हे घडले आहेत. याच कालावधीत २०१५ मध्ये मे अखेर खुन-२७, दरोडा-, चैन स्नॅचिंग-६, घरफोडी-७०, वाहनचोरी-११५, विनयभंग-६५ गुन्हे घडले होते.

सन २०१५च्या तुलनेत सन २०१६ मध्ये खुन, दरोडा, घरफोडी, विनयभंग गुन्ह्यात घट झालेली असुन चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्यात एका गुन्ह्यांनी वाढ झालेली आहे. सदर घडलेल्या गुन्ह्यावरुन लातूर जिल्ह्यात कसल्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झालेला नाही.

(२) हे खरे नाही, शहरातील चौका चौकात बसवलेले सी.सी.टी.व्ही. यंत्रणा चालू आहे.

(३) लातूर शहरात गुन्हे रोखण्यासाठी रात्रगस्त परिणामकारक राबविण्यात येत आहे. तसेच चार्ली व बिट मार्शल पेट्रोलींग, महिलागस्त पथक पेट्रोलींग कायमरित्या चालू आहे. शहरात तसेच जिल्ह्यांच्या सिमेवर नाकाबंद चालू आहे. जिल्हा स्तरावर २ दरोडा प्रतिबंधक पथक, जिल्हा स्तरावर रात्रगस्त पेट्रोलींग व सेक्टर पेट्रोलींग ३ पथक नेमण्यात आलेले आहेत. सर्व पोलीस स्टेशनला रात्रग्रस्त व दरोडा प्रतिबंधक पथक पेट्रोलींग नियमित चालू आहे.

तसेच मोटार वाहन चोरीचे गुन्हे घडु नयेत म्हणुन गर्दीच्या ठिकाणी साध्या वेषातील पोलीसांचे सापळे लावण्यात आले आहेत व सी. सी. टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. संवेदनशील ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आलेले आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

## औरंगाबाद येथील विविध भाजीमंडईतून मोबाईलची चोरी होत असल्याबाबत

**(१२) ४२७८५ (१७-०५-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील विविध भाजी मंडईतील प्रामुख्याने शहाबाज, जाधववाडी, मुकुंदवाडी, जाफरगेट येथील बाजारातून गर्दीचा फायदा घेत अनेक लोकांचे मोबाईल चोरीला गेले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मोबाईल चोरी प्रकरणी संबंधित पोलीस स्थानकात गुन्हे नोंद करण्यात आले असुन याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) जानेवारी २०१६ मध्ये मोबाईल चोरीला गेल्याबाबत १५ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(२) मोबाईल चोरी प्रकरणी संबंधीत पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले असून चोरीस गेलेल्या मोबाईलची कंपनी, मॉडेल नंतर, IMEI नंबर प्राप्त करुन संबधीत मोबाईलमध्ये असलेल्या सिमकार्डनुसार संबंधीत कंपनीचे नोडल ऑफिर्ससकडून चोरीस गेलेल्या

मोबाईलचे टॉवर लोकेशन व त्यात कोणते नवीन सीम टाकून वापरण्यात येत आहे, या बाबतची माहिती घेण्यात येत आहे. लोकेशन व मोबाईल नविन सीम बाबत माहिती मिळाल्यास त्याचा शोध घेणेकामी तपास पथक रवाना करुन चोरीस गेलेला मोबाईल व आरोपीचा शोध घेऊन मोबाईल हस्तगत करुन आरोपीस अटक करुन योग्य तपास करण्यात येतो. तसेच मोबाईल चोरीस आळा घालण्यासाठी भाजीमंडई, बाजार व गर्दीच्या ठिकाणी साध्या गणवेशात गुन्हे शोध पथकाची पायी पेट्रोलींग तसेच बीट मार्शलची पेट्रोलींग सुध्दा वाढविण्यात आली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष यांना जीवे मारण्याच्या**
**धमक्या देण्यात येत असल्याबाबत**

**(१३) ४३१९७ (१७-०५-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारताचे पंतप्रधान यांच्या विरोधात केलेल्या वक्तव्यामुळे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष यांना ठार मारण्याचा धमक्या माहे डिसेंबर, २०१५ पासून येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धमक्या एका सामाजिक संघटनेच्या वकीलांनी दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधिताविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा शहरातील डी.जी. व सायन्स कॉलेजच्या बाहेर युवकांच्या दोन गटांनी एकमेकांवर हल्ला केल्याबाबत**

**(१४) ४३४६६ (१६-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा शहरातील डी.जी. व सायन्स कॉलेजच्या बाहेर युवकांच्या दोन गटात माहे डिसेंबर, २०१५ मध्ये भांडण होऊन भर दिवसा नंग्या तलवारी व कोयते घेऊन एकमेकांवर हल्ला करण्यात आला असून परिसरात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) सदर भांडणात दोन गटातील युवकांनी तलवारी, कोयते यांचा वापर केला नसून काठी व दगड यांचा वापर केला होता.

(२) सदर, प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५७३/२०१५ भा.दं.वि. कलम ३३७, १६० प्रमाणे दिनांक ०६/१२/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्यात ताब्यात घेण्यात आलेल्या ५ निष्पन्न विधीसंघर्ष बालकांना मा. न्यायालयाने पर्सनल बॉन्डवर मुक्त केले आहे. सदर गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**कोल्हापूर शहरात नागरिकाला जगाची सफर करुन देत फसविणा-या अनेक कंपन्यांची कार्यालये मोठया प्रमाणत सुरु असल्याबाबत**

**(१५) ४६०८६ (१७-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात सर्वसामान्य नागरिकाला जगाची सफर करुन देत फसविणा-या अनेक कंपन्यांची कार्यालये मोठया प्रमाणात सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी फसवणूक होणा-यांच्या संख्येत कोल्हापूर शहरात मोठया प्रमाणात वाढ होत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बोगस कंपन्याचा शोध घेऊन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही, नमूद प्रकरणी एका व्यक्तीची फसवणूक झाल्याबाबत कोल्हापूर येथे एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) या गुन्ह्यातील फिर्यादी श्री. संदीप भिमराव पाटील यांनी इनबॉन्ड टु थायलंड या कंपनीमार्फत टुर आयोजित करण्यासाठी श्री.रविश सिंग.रा.नबसराई, दिल्ली यांच्याशी मोबाईल फोन, व्हॉट्सअप व मेल आय.डी वर संपर्क साधून १८ विमान प्रवासाची तिकीटे खरेदी केली. त्यासाठी त्याने रुपये ५,१०,०००/- इतकी रक्कम कंपनीस अदा केली. परंतु सदर तिकिटे बोगस असल्याचे निदर्शनास आल्याने श्री.संदीप पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार श्री. रविश सिंग यांच्या विरुध्द जुनाराजवाडा पो.स्टे. येथे गु.र.नं. ६६/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६५, ४६८. सह आय .टी. ॲक्ट कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा चौकशीकामी आरोपीस हजर राहण्याकरीता नोटीस दिलेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

या गुन्ह्या व्यतिरिक्त इतर व्यक्तिची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झालेले नाही. तसेच सदर कंपनीविरुध्द इतर कोणीही तक्रार अथवा गुन्हा दाखल केलेला नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

**नाशिक शंहर येथे एलईडी दिव्याचा अपहार करण्यात आल्याबाबत**

**(१६) ४६६३९ (१७-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रकाली पोलीस ठाणे (नाशिक शहर) येथे हैद्राबाद मधील एमआयसी इलेक्ट्रॉनिक्स या कंपनीच्या संचालकांनी नाशिक महानगरपालिकेसाठी पाठविलेल्या साडेचार कोटी रुपये किंमतीच्या एलईडी दिव्यांचा अपहार झाल्याप्रकरणी तक्रार नोंदविल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कंपनीच्या संचालकांनी भद्रकली पोलीस ठाण्यात नोंदविलेल्या तक्रारीमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या तसेच उपरोक्त प्रकरणाबाबत शसनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी भद्रकाली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४६७/२०१५ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपी सद्या जामिनावर असून, गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**गाधवड (जि. लातूर) परिसरात तसेच संपूर्ण जिल्हयातील अवैध धंदे बंद करण्याबाबत**

**(१७) ४७६१० (१७-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाधवड (जि. लातूर) परिसरात तसेच संपूर्ण जिल्हयात मटका, अवैध दारु विक्री, जुगार इतर अवैध धंदे मोठया प्रमाणावर वाढले असून सदर अवैध धंदे त्वरीत बंद करण्याबाबत नागरीकांनी दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास पोलिस अधिक्षक, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध धंदे बंद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१५ अखेर जुगार कायद्याअंतर्गत ३६१ केसेस दाखल असुन त्यात ११८१ आरोपीस अटक करुन त्यांच्याकडून ७,२६५,४९८/- रुपये जप्त करण्यात आले असून दारुबंदी कायद्याअंतर्गत १०४५ केसेस दाखल करुन त्यात १०८० आरोपीस अटक करुन त्यांच्याकडून ४१,४१,७८६/- रुपये जप्त करण्यात आले आहेत. तसेच माहे जानेवारी ते एप्रिल २०१६ मध्ये जुगार कायद्याअंतर्गत १४१ केसेस दाखल करुन त्यात ३७६ आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यांच्याकडून ११,८९,२९८/- रुपये जप्त केले आहे. तसेच दारुबंदी कायद्याअंतर्गत ३४६ केसेस मध्ये ३२४ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून १४,४८,२१७/- रुपये जप्त करण्यात आले आहेत.

तसेच अवैध धंदे समुळ बंद करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशनमधील प्रभारी अधिकाऱ्यांना लेखी व समक्ष सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यासह ओरीसा, मध्यप्रदेश येथे चिटफंडसारख्या विविध गुन्हयातील आरोपी मोतेवार याच्या खाजगी सुरक्षा रक्षकांनी पत्रकाराना धक्काबुक्की केल्याबाबत**

**(१८) ४७६४२ (२४-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह ओरीसा, मध्यप्रदेश पोलिसांना चिटफंडसारख्या विविध गुन्हयात आरोपी असलेल्या महेश मोतेवार यास उस्मानाबाद पोलिसांनी माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात अटक केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी मोतेवार यांच्या खाजगी सुरक्षा रक्षकांनी पत्रकाराना धक्काबुक्की केल्याची तक्रार उस्मानाबाद पोलीस स्थानकात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोतेवार यांचे विरोधात आणि पत्रकारांना धक्काबुक्की केल्याबाबत खाजगी सुरक्षा रक्षकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) महेश मोतेवार यास उस्मानाबाद पोलिसांनी चिटफंड सारख्या गुन्ह्यात अटक केली नसून रेवते ॲग्रो प्रा.लि. या नावाने चालु असलेली दुध डेअरी मधील भागीदारांना अंधारात ठेवुन नुकसान करण्याच्या दृष्ट हेतुने फसवणुक करुन व्यवहार केले व त्यानंतर कंपनीच्या जागेवर अतिक्रमण करुन कंपनीमधील मशिनरीची नासधुस केली. याकरीता महेश मोतेवार यांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणात पोलीस स्टेशन मुरुम येथे गु.र.नं. ३/२०१२ भा.दं.वि.कलम ४२०, ४२७, ४४८, ४९१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(२) व (३) होय.

सदर प्रकरणी संतोष सुभाष जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन महेश मोतेवार यांचे खाजगी सुरक्षा रक्षक शहानुर काझी व इतर एक यांचेविरुध्द पोलीस स्टेशन उस्मानाबाद येथे गु.र.नं. १४३६/२०१५ भा.दं.वि.कलम ३२३, ५०६, ३४ प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महेश सुभाष पोतदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन शहानुर काझी व इतर-२ यांचेविरुध्द पोलीस स्टेशन उस्मानाबाद येथे गु.र.नं. १४३७/२०१५ भा.दं.वि.कलम ३२३, ३४ प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उक्त प्रकरणी दोन्ही गुन्ह्यातील आरोपी शहानुर काझी यास अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस जामिनावर सोडले आहे व इतर दोन आरोपींविरुध्द तक्रार नसल्याने त्यांना कलम १४९ प्रमाणे नोटीस व ताकीद देवून सोडण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्य शासनातील मंत्री कार्यालयेही माहिती अधिकाराच्या कक्षेत आणून या कार्यालयांमध्येही जनमाहिती अधिकारी नियुक्त करण्याबाबत

**(१९) ४९५८७ (२०-०५-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनातील मंत्री कार्यालयेही माहिती अधिकाराच्या कक्षेत आणून या कार्यालयांमध्येही जनमाहिती अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश राज्य माहिती आयोगाने माहे सप्टेंबर २०१४ मध्ये वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मंत्री कार्यालयामध्ये अद्यापही जनमाहिती अधिकारी नेमण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंत्री कार्यालये माहिती अधिकार कक्षेत न आणण्याची व जनमाहिती अधिकारी न नेमण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६):** (१) मंत्री/राज्यमंत्री कार्यालयातील सुयोग्य अधिकारी/कर्मचारी यांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्याचे आदेश मा.मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २४/९/२०१५ रोजी दिले आहेत हे खरे आहे.
(२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:तक्रार-२६१५/१४५०/प्र.क्र.२९९/२१ दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे कार्यालयात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी पदनिर्देशित करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील ताराबाई पार्क रेसिडेन्सि क्लब समोरील विद्या अपार्टमेंटमध्ये दिवसा साडेपाच लाख रुपयांची चोरी झाल्याबाबत**

**(२०) ५१६९६ (१६-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील ताराबाई पार्क रेसिडेन्सी क्लब समोरील विद्या अपार्टमेंटमध्ये भर दिवसा साडेपाच लाख रुपयांची जबरी चोरी झाल्याचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे पण खरे.

नमूद प्रकरणी अज्ञात इसमाविरुध्द शाहपूरी पोलीस ठाणे येथे गु. र. नं ६९/२०१६ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दि. १३/०२/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हा घडलेल्या घटनास्थळाचा पंचनामा करुन आरोपीचा शोध घेण्यासाठी श्वान पथकाची, अंगुली मुद्रा अधिकाऱ्यांची मदत घेण्यात आली. तसेच अज्ञात चोरट्यांचा व चोरीला गेलेल्या मालाचा शोध घेण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व वायरलेस स्थानके यांना बिनतारी संदेश, तपास याद्या व संशयीत आरोपीचे नाव व पत्ता मिळणेकामी स्थानिक गुन्हे शाखा यांना ई फॉर्म पाठविण्यात आले आहेत. तसेच चोरीला गेलेले मोबाईल, हॅन्डसेट ट्रेसिंगवर ठेवण्यात आले आहेत. गुन्ह्याचा शोध घेण्याकामी सर्वोतोपरी प्रयत्न सुरु आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**जालना जिल्हयातील शेतकऱ्यांचे बैलचोरीला गेल्याबाबत**

**(२१) ५१८०९ (२०-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात अंबड तालुक्यातील भायडी व भोकरदन तालुक्यातील बोरगांव जहांगीर येथील शेतकऱ्यांचे बैल चोरीला गेल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या प्रथम आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिस स्टेशनला तक्रारीही देण्यात आल्या असून याबाबत अद्यापर्यंत कोणताही तपास लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
माहे डिसेंबर २०१५ मध्ये पोलीस ठाणे अंबड, गोंदी व भोकरदन येथे बैल चोरीचे गुन्हे दाखल नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना शहरातील वाढत्या चोरी व घडफोडीच्या घटनांबाबत**

**(२२) ५१९३९ (१६-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरातील बिहारीलाल नगर परिसरात दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास घराचा दरवाजा तोडून रोख रक्कम व सोन्याचांदीचे दागिने चोरीला गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना शहरात सन २०१५ या वर्षात घरफोडया व चोरीच्या सुमारे ७०० पेक्षा जास्त घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांचा पोलिसांनी तपास केला आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले असून त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शहरातील वाढत्या घरफोडया व चोरीच्या प्रकरणाना प्रतिबंध करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे,

सदर प्रकरणी बाजार पोलीस ठाणे जालना येथे गुरनं ३३०/२०१५ भा.दं.वि कलम ४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्यात एका आरोपीस अटक करुन त्याच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले आहे.

(२) हे खरे नाही,

सन २०१५ मध्ये जालना शहरात घरफोडीचे ६४ व चोरीचे १७८ गुन्हे दाखल आहेत.

(३) नमुद दाखल गुन्ह्यांचा तपास पोलीसांनी करुन घरफोडीचे (३१) व चोरीचे (६७) गुन्हे उघडकीस आणले असुन निष्पन्न आरोपींना अटक करुन त्यांचे कडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी विरुध्द मा. न्यायालयात खटले दाखल केले आहेत. तसेच गुन्हे घडू नये म्हणुन प्रभावग्रस्त भागात पोलीसांची रात्रगस्त वाढविण्यात आली आहे व गुन्हे करणारे आरोपीवर योग्य ती प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथे एका खाजगी सावकाराला अभय देण्यासाठी ५० हजारांची खंडणी मागितल्याबाबत**

**(२३) ५२६३६ (२४-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि. कोल्हापूर) शिवाजीनगर, पोलिस ठाणे येथे एका खाजगी सावकाराला अभय देण्यासाठी ५० हजारांची खंडणी मागितल्याप्रकरणी मा.राज्यमंत्री गृह यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केल्याचे दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अप्पर पोलिस अधिक्षक डॉ.दिनेश बारी यांनी दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) गुन्ह्याच्या तपासात अर्जदार यांचा पुतण्या व त्याचा मित्र यांचेवर गुन्हा दाखल केल्याने त्यांना चौकशीकामी शिवाजीनगर पोलीस ठाणेस घेवून गेल्याने अर्जदार यांनी गैरसमजुतीने सदरचा तक्रारी अर्ज केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच अर्जदार यांनी सुध्दा त्यांचा पुतण्या व त्याचा मित्र यास कोणतीही मारहाण केली नसल्याचे तसेच त्यांच्याकडे ५०,०००/- रुपये मागणी केली नसल्याचे जबाबात नमूद केले आहे. त्यामुळे संबंधितावर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

**निजामपूर (ता.साक्री, जि.धुळे) येथील ग्रामपालिकाचे सरपंच यांना जीवे ठार मारण्याची धमकी मिळाल्याबाबत**

**(२४) ५३१८६ (२४-०५-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निजामपूर (ता.साक्री, जि.धुळे) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. अजितचंद्र शहा यांना माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जीवे ठार मारण्याची धमकी मिळाली असल्याने सदर घटनेमुळे गावकऱ्यांनी एका दिवसाचा बंद पाळला होता , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धमकी देणारे गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे त्यापासून श्री.शाह यांच्या जिवीतास धोका असल्यामुळे या प्रकरणी निजामपूर, जैताणे पाेलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात येवूनही अद्याप कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकारणी शासनाने दखल घेवून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
सदर प्रकरणी आरोपीविरुध्द निजामपुर पोलीस ठाणे येथे प.नॉ.कॉ.र.नं. ३२/२०१६ भा.दं.वि. कलम ५०७ प्रमाणे दि.०१/०३/२०१६ रोजी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपीविरुध्द मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी धुळे यांच्याकडे आरोपीविरुध्द चॅप्टर क्रमांक ७६/२०१५, क्रि.प्रो.को. कलम १०७ प्रमाणे प्रस्ताव पाठविला होता. त्यावरुन कार्यकारी दंडाधिकारी यांनी आरोपीस रुपये २५,०००/- किंमतीचा एक वर्ष मुदतीचा चांगली वर्तणुक ठेवण्याबाबतचे बंधपत्र घेण्यात आले तसेच बंधपत्र रद्द होण्यासाठी आरोपीने केलेल्या अर्जावर खुलासा सादर करण्याबाबत नोटीस अदा करण्यात आली असुन त्याअनुषंगाने प्रकरण मा. न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळोजा मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांसाठी नवी मुंबई पोलिसांना जास्तीचे पोलिस बळ पुरवावे लागत असल्याबाबत**

**(२५) ५३७०७ (२३-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील तळोजा मध्यवर्ती कारागृहात १०० पदे मंजूर असतानाही नवी मुंबई पोलिसाना कारागृहातील कैद्यांसाठी जास्तीचे पोलिस बळ पुरवावे लागत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मध्यवर्ती कारागृहामध्ये बॉम्ब स्फोटासारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपींसह गँगस्टर तसेच इतर गुन्ह्यातील हजारो आरोपी बंदीस्त असून सुमारे २०० ते २५० कैद्यांना दर दिवशी विविध ठिकाणच्या ३४ न्यायालयात हजर करण्यासाठी न्यावे व आणावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळोजा मध्यवर्ती कारागृहात दरदिवशी अतिरिक्त पोलीस बळ पुरवावे लागत असल्यामुळे शहरातील व ग्रामीण भागातील कायद्या व सुव्यवस्थेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवी मुंबई आयुक्तालयाच्या हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबादीत राहण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :** (१) होय. बंद्यांना न्यायालयात कोर्टपेशीसाठी हजर करण्यासाठी व उपचारासाठी घेवून जाणेची जबाबदारी प्रामुख्याने पोलीस विभागाची असून त्याकरिता पोलीस पथकाची तरतूद सदर विभागाकडून करण्यात येते. त्या अनुषंगाने तळोजा मध्यवर्ती कारागृह, नवी मुंबई येथील बंद्यांना सन्मा. न्यायालयात हजर करणेकामी राखीव पोलीस निरीक्षक, कळंबोली, नवी मुंबई यांचे अखत्यारित २३९ पोलीस बळ उपलब्ध आहे. त्यापैकी सरासरी १७५ मनुष्यबळ पोलीस पथक म्हणून कारागृहास प्राप्त होते. व त्यानुसार रोज फक्त सरासरी ८० ते ९० बंद्यांना वेगवेगळया सन्मा. न्यायालयात कोर्टपेशीकामी हजर केले जाते. प्रत्यक्षात दररोज सुनावणीकामी जाणाऱ्या बंद्यांची सरासरी २०० ते २५० बंदी इतकी असते. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळ हे अपुरे असून अजून १०० जणांचे पोलीस पथकाची आवश्यकता तळोजा मध्यवर्ती कारागृहास आहे.

(२) होय. तळोजा मध्यवर्ती कारागृहामध्ये बॉम्बस्फोटासारख्या गंभीर गुन्हयातील आरोपीसह गँगस्टर तसेच इतर गुन्हयातील अंदाजे २००० (दोन हजार) बंदी बंदीस्त असून सुमारे २०० ते २५० कैद्यांना दर दिवशी विविध ठिकाणच्या सन्मा. न्यायालयात हजर करणेसाठी कळंबोली मुख्यालय, नवी मुंबई व अलिबाग मुख्यालय, रायगड यांचेकडे पोलीस पथकाची मागणी करण्यात येते. परंतु अपुरे पोलीसबळामुळे रोज फक्त ८० ते ९० बंदी वेगवगळया सन्मा. न्यायालयात कोर्टपेशीकामी हजर केले जातात.

(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उरण तालुक्यातील हुतात्म्यांच्या स्तृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मारकांची दुरावस्थेबाबत**

**(२६) ५३७३६ (२९-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील चिरनेर येथे झालेल्या जंगल सत्याग्रहाच्या लढयात हौतात्म्य पत्करलेल्या आठ हुतात्म्यांची स्मारके त्यांच्या मूळ गावी शासनाने उभारलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उरण तालुक्यातील हुतात्म्यांच्या स्तृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मारकांपैकी एक-दोन स्मारकांचा अपवाद वगळता उर्वरित स्मारकांची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

उरण तालुक्यामध्ये चिरणेर येथे सन १९३० साली झालेल्या जंगल सत्याग्रहात हुतात्मा झालेल्या हुतात्मांची स्मारके मौजे चिरणेर, मोठी जुई, खोपटे कोप्रोली, पाणदिवे, दिघोडे व घाटकी जुई येथील सात लोकांनी बलिदान दिल्याने, या ठिकाणी शासनाकडून हुतात्मा स्मारके उभारण्यात आलेली आहेत.
(२) व (३) अर्थसंकल्पिय वर्ष २०१६-२०१७ मध्ये राज्यातील सर्व हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व नूतनीकरण करण्यासाठी रु.२५ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने राज्यातील सर्व (सुस्थित असलेले वगळून) हुतात्मा स्मारकाची दुरुस्ती व नूतनीकरण करण्याचे प्रस्तावित असून या संदर्भात मा.राज्यमंत्री (वित्त, नियोजन व गृह (ग्रामीण)) यांचे अध्यक्षतेखाली दोन बैठका सुध्दा पार पडल्या आहेत. सर्व हुतात्मा स्मारकांच्या मुलभूत महत्वाच्या कामांची दुरुस्ती कशा प्रकारे करण्यात यावी यासाठी मा.राज्यमंत्री (वित्त नियोजन व गृह (ग्रामीण)) यांचे मार्गदर्शनाखाली कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शासकीय नोकरीसाठी वयोमयादेत वाढ करण्याबाबत

**(२७) ५३७६५ (२३-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय नोकरीसाठी वयोमर्यादेत वाढ करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी केलेल्यांना लवकरात लवकर नोकऱ्या मिळाव्यात म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) व (२) होय. शासन सेवेतील प्रवेशासाठी, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी असलेली ३३ वर्षे ही कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवून त्यांची कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागावर्गीय उमेदवारांसाठी असलेली ३८ वर्षे ही कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवून त्यांची कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे करण्याबाबत दि २५.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये आदेश दिलेले आहेत.

(३) व (४) नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी केलेल्यांसाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत असलेली कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता केंद्रे यांच्यामार्फत बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका निर्माण करणे,रोजगार मेळावे आयोजित करणे,बेरोजगारांची सेवा सहकारी संस्था स्थापन करणे,आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र,सुरिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम,कैशल्य विकास,रोजगार व उद्योजकता केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राची स्थापना,प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान या सारखे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

---

## वसई विरार महानगर पालिकेच्या नियोजन विभागाच्या उपसंचालकांना लाच देतांना अटक करण्यात आल्याबाबत

**(२८) ५३८५० (२३-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर),**

**श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार महानगर पालिकेच्या नियोजन विभागाच्या उपसंचालकांना २५ लाखाची लाचेची रक्कम देताना दिनांक २८ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपसंचालक रचनाकार यांचेकडे २ कोटी ९६ लाख ९४ हजारांची रक्कम आढळून आल्याचे माहे मे, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१६) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे, वसई विरार महानगर पालिकेचे उपसंचालक नगररचनाकार आरोपी लोकसेवक यमीगनू शिवा रेड्डी यांचेविरुध्द सापळा कारवाई झाल्यानंतर दि.२८.४.२०१६ रोजी वसई येथील घरझडती, दि.२९.४.१६ व रोजी हैद्राबाद येथील घरझडती व दि.०४.०५.१६ रोजी वसई येथील लॉकर झडती घेण्यात आली. त्या सर्व घर झडतीमध्ये एकूण रु.१,२७,२१,३००/- रोख रक्कम व इतर मालमत्ता रु.९२,५९,६००- अशी एकूण रु.२,१९,८०,९००/- किंमतीची मालमत्ता आढळून आलेली आहे.

(३) याप्रकरणी आरोपी लोकसेवक यमीगनु शिवा रेड्डी, उपसंचालक, नगररचना विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका (वर्ग-१) यांचेविरुध्द कासारवडवली पोलिस स्टेशन (ठाणे शहर पोलिस आयुक्तालय) येथे गु.र.नं. ५४/२०१६ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा कलम १२ प्रमाणे दि.२९.४.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या मालमत्तेबाबत उघड चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील राजकिय पक्ष व सामाजिक संघटनामार्फत आंदोलनाबाबत दाखल झालेल्या आंदोलकावरील खटले निकालात काढण्याबाबत

**(२९) ५४४०३ (२३-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील शहर आणि ग्रामीण भागातील राजकिय पक्ष व सामाजिक संघटना यांच्याकडून लोकहिताच्या मागण्यांसाठी होणा-या आंदोलनाबाबत दाखल झालेल्या विविध राजकिय

गुन्हयांचे खटले निकालात काढण्यासाठी महिन्यातून ४ बैठका सक्षम व वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी घ्याव्यात असे आदेश  गृह राज्यमंत्र्यांनी पोलीस प्रशासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर राजकिय आंदोलनातील किती खटले आतापर्यंत मागे घेण्यात आले आहेत वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) अद्याप आदेशाच्या अनुषंगाने अंमलबजावणीस सुरुवात झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) शासन निर्णय गृह विभाग दि. १४.३.२०१६ मधील परिच्छेद क्र. ४ (४) नुसार समितीच्या शासन निर्णयाच्या तारखेपासून ६ महिने, महिन्यातून ४ बैठका घ्याव्यात व त्यानंतर महिन्यातून किमान एक बैठक घेण्याची यावी, अशा सूचना आहेत,
(२) शासन निर्णय गृह विभाग दि. १४.३.२०१६ सूचनानुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्यासंदर्भात समितीने दि. १५.३.२०१६ नंतर ४७० खटले मागे घेण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरबाड (जिल्हा ठाणे) पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांना लाच स्वीकारताना अटक करण्यात आल्याबाबत**

**(३०) ५४८२९ (२३-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जिल्हा ठाणे) पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांना मानिवली रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे देयक मंजूर करुन देण्यासाठी २५ हजार  रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडकले असल्याचे दिनांक २ जून, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) या प्रकरणी आरोपी लोकसेवक विठ्ठल मधुसुदन धात्रक, सहायक अभियंता, पंचायत समिती, मुरबाड जि.ठाणे यांचेविरुध्द मुरबाड पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) सह १३(२), प्रमाणे दि. ०१/०६/२०१६ रोजी गु.र.क्र..०६/२०१६ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

---

**धुळे शहरातील चोऱ्या, लुटमारीचे प्रकार रोखण्याबाबत**

**(३१) ५५५५४ (२३-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील चितोड रोड परिसरात बंद घराचे कुलुप तोडून चोरटयांनी दोन लाखांचा ऐवज लुटून नेल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात वारंवार होणाऱ्या चोऱ्या, लुटमारीचे प्रकार रोखण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

श्री.सुनिल बजरंगलाल सिंघानिया यांच्या घरातील १,५०,०००/- रुपये रोख व ५०,०००/- रुपयांचे चांदीचे दागिने असा एकूण २,००,०००/- रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांची चोरुन नेल्याबाबत धुळे शहर पो.स्टे. येथे गु.र.नं. ९३/२०१६ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दि.२८/०४/२०१६ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(२) धुळे शहरात तसेच जिल्ह्यात लुटमारीचे प्रकार रोखण्यासाठी शहरात एकूण १८ बिट मार्शल ची गस्त वाढविण्यात आली आहे. ग्रामीण भागात पोलीस मित्रांच्या मदतीने गस्त घालण्यात येते. तसेच वेळोवेळी नाकाबंदी व ऑल आऊट सारख्या योजना राबवुन संशयीत वाहने व संशयीत इसम यांना चेक करण्यात येते.

(३) विलंब झालेला नाही.

---

**तर्डोली (ता.बारामती, जि.पुणे) गावामध्ये अघोरी पुजेसाठी आर्थिक प्रलोभन दाखवून मुलीची मागणी करणाऱ्याना अद्याप अटक न करण्यात आल्याबाबत**

**(३२) ५६५०२ (२३-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तर्डोली (ता.बारामती, जि.पुणे) गावामध्ये अघोरी पुजेसाठी आर्थिक प्रलोभन दाखवून मुलीची मागणी करणाऱ्या ६ जणांना दिनांक २९ मे, २०१६ रोजी अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडगाव निंबाळ पोलीस स्टेशनला सुरुवातीला तीन दिवस पोलीसांनी गुन्हा दाखल करुन न घेता तक्रार अर्जाच्या आधारे चौकशी करुन संशयीतांना सोडून देण्यात आले तसेच मुख्य आरोपीसह २ संशयीतांना अद्यापही अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :**(१) तर्डोली (ता.बारामती, जि.पुणे) गावामध्ये अघोरी पुजेसाठी आर्थिक प्रलोभन दाखंवून मुलीची मागणी करणाऱ्या ६ जणांना दिनांक २६ मे, २०१६ रोजी तद्नंतर आणखी १ आरोपीस दिनांक ३१ मे, २०१६ रोजी अटक करण्यात आली आहे तर १ आरोपी हा अंपग असल्याने त्यास अटक केलेली नाही.
(२) हे खरे नाही
(३) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन आठ आरोपींविरुध्द वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१६१/२०१६ महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष प्रथा व जादुटोना प्रतिबंधक कायदा २०१३ चे कलम २(१) (ख) (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आठ आरोपीपैकी सात आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तर उर्वरीत एक आरोपी अपंग असल्याने त्यास अटक केलेली नाही. गुनहा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील विक्रोळी व भांडूप परिसरात गावठी दारुची विक्री होत असल्याबाबत

**(३३) ५७४५१ (२३-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालवणी दारुकांडानंतर गावठी दारुच्या भट्ट्या व गुत्ते पोलीसांनी उद्ध्वस्त केले असून मात्र अद्यापही विक्रोळी व भांडूप परिसरात गावठी दारुची विक्री होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उपरोक्त प्रकरणी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) परिमंडळ-७ मधील विक्रोळी व भांडूप परिसरात गावठी दारूची विक्री होत असल्याप्रकरणी माहे जून, २०१६ मध्ये गावठी दारू विक्री संदर्भात कोणत्याही गुन्हयांची नोंद नाही. परंतु पार्कसाईट पोलीस ठाणे येथे माहे जून २०१६ मध्ये गावठी दारूची बेकायदेशीररित्या वाहतूक केल्याप्रकरणी विशेष स्था. ख. क्र. (पी.सी.आर) ०४/१६ कलम ६५ (ई) मुंबई दारूबंदी अधिनियम १९४९ अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर प्रकरणी २ आरोपींना १८००० रू. किंमतीची ४५ लिटर गावठी दारू बेकायदेशीररित्या घेऊन जात असताना अटक करण्यात आलेली आहे.
(२) वरीलप्रमाणे गुन्हा नोंदविण्यात येऊन त्यामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१. परिमंडळ-७ पोलीस ठाणे हद्दीतमध्ये विशेषत: झोपडयांमध्ये मोहल्ला कमिटी व महिला दक्षता कमिटी यांच्या मिटींग घेवून त्यांना त्यांचे आजूबाजूच्या परिसरात कोणीही अवैधरित्या गावठी दारुची विक्री करीत असल्याबाबत काही माहिती

असल्यास तात्काळ पोलीस ठाणे कळविण्याबाबत सुचति केले आहे. तसेच गावठी दारूच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणाबाबत त्यांना माहिती देवून व त्यापासून दूर राहण्यासाठी उत्स्फूर्त केले.

२. दारू विक्रीच्या संशयित असणाऱ्या जागांची वेळोवेळी विशेष पथकामार्फतीने तपासणी करण्यात येते.

३. पोलीस ठाणे अभिलेखावरील यापूर्वी दारूबंदीच्या गुन्हयामध्ये असलेल्या आरोपीतांविरूध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

४. परिमंडळातील पोलीस ठाणे हद्दीमध्ये महिलांच्या बैठका घेवून त्यांना अवैध दारू विकणारे किंवा दारू पिऊन उपद्रव निर्माण करणाऱ्या व्यक्ती आढळून आल्यास त्याबाबतची माहिती वॉट्सअप मोबाईल नं.७०४५७५७२७२ पाठवून पोलीसांना सहकार्य करण्याबाबत आवाहन केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथील कृषी सहाय्यकास लाच स्वीकारतांना पकडल्याबाबत**

**(३४) ५७६६० (२३-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (नाशिक) येथील कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी सहाय्यक सुर्यकांत दगू दिघे यांस २० हजारांची लाच स्वीकारतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाचखोर अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.सुर्यभान दगू दिघे कृषि सहायक मंडळ कृषि अधिकारी कार्यालय,येवला जि.नाशिक यांचेविरूध्द येवला शहर पोलिस ठाणे येथे गु.र.नं ३०१५/२०१६ लाचलुपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७,१२,१३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दिनांक २१/४/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.तसेच आरोपी लोकसेवक श्री.दिघे हे सध्या निलंबित आहेत.

---

**गेवराई (जि.बीड) येथील गोदावरी नदीपात्रात होणा-या अवैध वाळू उपसावर प्रतिबंध घालण्यास गेलेल्या नायब तहसिलदार, तलाठी व पोलीस कर्मचा-यांच्या डोळ्यात मिरची पूड फेकून मारहाण केल्याबाबत**

**(३५) ५७७३४ (२३-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील गोदावरी नदीपात्रात होणा-या अवैध वाळू उपसावर प्रतिबंध घालण्यास गेलेल्या नायब तहसिलदार तलाठी व पोलीस कर्मचा-यांच्या डोळ्यात मिरची पूड फेकून मारहाण करुन गंभीर इजा केल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :** (१) वैद्यकीय अधिकाऱ्यांनी साधी दु:खापत झाल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्रात नमुद केले असून साक्षीदारांनी मिरची पुडेचा वापर केला नसल्याचे जबाबात नमुद केले आहे

(२) सदर प्रकरणी गेवराई पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १५४/१६ भा.द.वि. कलम ३५३,१४३,१४७, ३७९, ३३२ सह ३ (१) (१०) अजाजअप्र कायदा व कलम ४८ महाराष्ट्र गौण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एकुण २९ आरोपी निष्पन्न झाले असुन त्यापैकी २३ आरोपीना मा. सत्र न्यायालय, बीड व ०३ आरोपींना मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी अटकपुर्व जामीन मंजूर केला आहे. तसेच उर्वरित ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सध्या ते मा. न्यायालयाच्या आदेशाने जामीनावर मुक्त आहेत. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरासह जिल्हयातील अन्य ठिकाणी जप्त केलेल्या वाहनांमुळे झालेल्या अस्वच्छतेने पोलिसांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(३६) ५७८८२ (२३-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरासह जिल्हयातील कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ-बदलापूर तसेच अन्य ठिकाणी जप्त केलेल्या तसेच अन्य कारणामुळे पोलिस स्थानकांच्या आवारांत वर्षांनुवर्षे पडलेल्या भंगार वाहनांची न्यायालयीन आदेश येईपर्यंत विल्हेवाट लावता येत नसल्याने वाहनांवर धुळ तसेच पावसाचे साचणारे पाणी व त्यामुळे निर्माण होणारे डास यामुळे पोलिस स्थानकाचा परिसर अस्वच्छ होवून पोलिसांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :** (१) व (२) ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशनच्या आवारात गुन्हयातील व इतर कारणांमुळे जप्त करण्यात आलेली वाहने ही त्यासंबंधी न्यायालयीन आदेश देईपर्यंत विल्हेवाट लावता येत नसल्याने ठेवण्यात येतात. तथापि सदर ठिकाणाची आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून किटकनाशकांची फवारणी करवून तसेच सफाई कामगारांकडून नियमित साफसफाई करवून घेतली जाते. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येऊ नये याबाबत दक्षता घेतली जाते. त्याचप्रमाणे जप्त करण्यात आलेल्या वाहनांबाबत वाहनांच्या मालकांना न्यायालयीन आदेश प्राप्त करून वाहने ताब्यात घेणेबाबत वेळोवेळी सुचित करण्यात येते. त्याचप्रमाणे बेवारस वाहनांसंबंधी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून मूळ मालकांचा पत्ता मिळवून त्यांचा शोध घेऊन जाणेबाबत कळविण्यात येते. मालकांचा शोध न लागलेल्या बेवारस वाहनांबाबत न्यायालयाकडून सदर वाहनांचे लिलाव करणेबाबतचे आदेश प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## नागपूर शहरात चेन स्नॅचिंगच्या प्रकारात वाढ झाल्याबाबत

**(३७) ५८०३५ (२३-०८-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील लकडगंज, आंबाझरी व प्रतापनगर पोलीस ठाणे हद्दीत मोठया प्रमाणात चेन स्नॅचिंगच्या प्रकारात वाढ झाल्याचे माहे जून, २०१६ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात चेन स्नॅचिंगच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :**(१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील लकडगंज व प्रतापनगर या पोलीस स्टेशन हद्दीत चेन स्नॅचिंगच्या प्रकारांमध्ये वाढ झालेली नाही तर अंबाझरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत चेन स्नॅचिंगच्या प्रकारात थोड्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

(२) नागपूर शहरात चेन स्नॅचिंगच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत

अ) पथक :- चैन स्नॅचिंग पथक स्थापन करण्यात आला आहे

ब) स्कुटी पेट्रोलींग :- महीला पोलीस कर्मचाऱ्यांमार्फत ८ स्कुटी सुझुकी वाहनांवरुन पेर्टोलींग सुरु करण्यात आले आहे

क) विशेष पथक :- गुन्हे शाखा नागपूर शहर येथे सोनसाखळी चोरी प्रतिबंधक विशेष पथक कार्यान्वीत करण्यात आले आहे

ड) नाकाबंदी पेट्रोलींग :- पोलीस स्टेशनचे हद्दीत वेळोवेळी नाकाबंदी कोंम्बींग राबविण्यात येत असून मोटार सायकल वरील कर्मचाऱ्यांची (चार्ली शस्त्र व वॉकीटॉकीसह) पेट्रोलीग वाढविण्यात आली आहे. तसेच संभाव्य ठिकाणी (वॉकींग ट्रॅक, निर्जन स्थळी तसेच सभागृह, मंगल कार्यालय) त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी महिलांची वर्दळ असते सोनसाखळी पळविणे सारखे गुन्हे होवू शकतात अशा ठिकाणी देखील पेट्रोलींग मध्ये वाढ करण्यात आली आहे तसेच अशा ठिकाणी पोलीसांची (महिला पोलीसांसह) पेट्रोलींग मध्ये वाढ करण्यात आली आहे

इ) गुन्हेगार दत्तक योजना :- चेन स्नॅचिंग करणाऱ्या अभिलेखावरील (५ वर्षाचे एकूण ६२५) गुन्हेगारांची यादी तयार करुन सर्व पोलीस स्टेशन येथे पोलीस स्टेशन निहाय पाठवून प्रत्येक कर्मचाऱ्यास एक असे गुन्हेगार चेकींग कामी दत्तक योजना कार्यान्वीत असून गुन्हेगारांना नियमित चेक करण्यात येते. आक्षेपार्य हालचाली असल्यास तात्काळ प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येते.

ई) पेट्रो व्हॅन :- सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा नागपूर शहर येथून दररोज ३ जीप गाडया ज्यामध्ये पोलीसांची (महीला पोलीसांसह) पेट्रोलींग लावण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त हे महत्वाचे वेळी स्वत: पेट्रोलींग करुन पोलीस कर्मचारी चेक करतात तसेच २८ पोलीस वाहने (पोलीस पेट्रोलींग) लोकांना दिसतील अशा महत्वाचे ठिकाणी नेमण्यात आली आहेत तसेच नजीकचे संवेदनशील ठिकाणी पेट्रोलींग करीता पाठविण्यात येते

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाणे हद्दीतील एका कुरीअरच्या गोदामात चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या तिघांना अटक करण्यात आल्याबाबत**

**(३८) ५८०८५ (२३-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाणे हद्दीतील एका कुरीअरच्या गोदामात दिनांक २५ एप्रिल २०१६ रोजी वा त्या सुमारास चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या तीन जणांना मालमत्ता विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपींवर विविध पोलिस ठाण्यात २० ते २५ गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. सदरबाबत लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणेत दि.२५.०४.२०१६ रोजी गु.र.क्र.१४१/१६, कलम ३९२, ४५२, ३२८, ३४ भादंवि सह कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपींवर काशीमीरा, वर्सोसा, नाशिक, पार्ली, खार व लोकमान्य टिळक, मार्ग पो.ठाणे, मुंबई येथे गुन्हे नमुद आहे.

(३) होय. सदरहू प्रकरणी पोलीस तपासात चौकशीत अटक आरोपींना सदरचा गुन्हा संघटीतपणे केलेला आहे. नमुद गुन्हयातील आरोपीतांवर कलम ३ (१)(२), ३(२), ३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ लावण्यात आलेली असून, नमूदचा गुन्हा पोलीस तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाठार (जि. कोल्हापूर) येथे पोलिस चौकीत दोन वर्षापासून पोलिस कर्मचारी नसल्याबाबत**

**(३९) ५८३७१ (२३-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाठार येथे (जि. कोल्हापूर) लाखो रुपये खर्च करुन उभारण्यात आलेल्या पोलिस चौकीत उद्घाटना नंतरही गत दोन वर्षापासून पोलिस कर्मचारी नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिस चौकीमध्ये कायमस्वरुपी पोलिसांची नेमणूक करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) वाठार पोलीस चौकीस अधिकृतरित्या एमएसआरडीसी/भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाची मंजूरी मिळालेली नसल्याने सदर पोलीस चौकीत पोलीस कर्मचारी नेमलेले नाहीत.

---

**राज्यातील महिलांना मंदिरांप्रमाणेच मशिदी आणि दर्गा यामध्ये प्रवेश देण्याबाबत**

**(४०) ५९८७० (२३-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांना मंदिरातील गाभाऱ्यात प्रवेश देण्याविषयी महिलांचे आंदोलन प्रारंभ झाल्यावर सदर प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयात विद्या बाळ यांनी दाखल झालेल्या जनहित याचिकेवर भूमिका मांडतांना शासनाने ‘मंदिरात पुरुषांप्रमाणे महिलांनाही प्रवेशाचे समान अधिकार असायला हवेत, असे स्पष्टपणे महाअधिवक्त्यांच्या माध्यमांतून उच्च न्यायालयात मांडले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मशिद व दर्गा या प्रार्थनास्थळांमध्येही महिलांना प्रवेश देण्याची मागणी महिला आणि त्यांच्या संघटनांच्या वतीने आंदोलने करून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंदिरांप्रमाणे मशिदी आणि दर्गा यांमध्ये महिलांना प्रवेश देण्याविषयी शासनाची काय भूमिका आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील मशिद व दर्गा या प्रार्थनास्थळांमध्ये महिलांना प्रवेश देण्याच्या मागणीबाबत हाजी अजी दर्गाह ट्रस्ट, नोंदणी क्र. B-२५१ (मुंबई) येथे महिलांना प्रवेश मिळविण्याच्या मागणीसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे नुरजहान सैफिया नियाज व झाकिया सोमन यांनी जनहित याचिका क्र. १०६/२०१४ दाखल केली होती. सदर जनहित याचिका दि. २६.०८.२०१६ रोजी निकाली निघाली आहे.
(३) मंदिरांप्रमाणे मशिदी आणि दर्गा यामध्ये महिलांनाही प्रवेशाचे समान अधिकार असायला हवेत ही शासनाची भूमिका स्पष्टपणे महाअधिवक्त्यांच्या माध्यमातून मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे मांडण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील पोलीस भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षेमध्ये झालेल्या गैरप्रकाराबाबत**

**(४१) ६०६४५ (२३-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील पोलीस भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षेमध्ये झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यात येणार असल्याचे गृह राज्यमंत्री यांनी माहे मे, २०१६ मध्ये सांगितले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) याप्रकरणी पोलीस ठाणे सिटी कोतवाली, जि.अकोला येथे गु.र.क्र. ४७/२०१६ कलम १२० (ब), ४१७, ४१९, ४२०, ४६४, ४६५, ४६८, ४७१ भादंवि सह महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रॅक्टिसेस अँन्ड यु.बोर्ड अदर स्पेसिफिकेशन एक्झामिनेशन ॲक्ट १९८२ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात १४ आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी १३ आरोपींना अटक करण्यात आली. एक आरोपी फरार आहे. तपासाअंती दोषारोप क्रमांक ३९/२०१६ अन्वये दिनांक २४-६-२०१६ रोजी मा.न्यायलयात दाखल करण्यात आले असून (क्रिमिनल केस क्रमांक ५८७/१६, दि.२४-६-२०१६) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## सातारा येथे लाचलुचपत विभागाने उत्पादन शुल्क विभागाच्या दुय्यम निरिक्षकास लाच स्वीकारताना अटक केल्याबाबत

**(४२) ६१३६० (२४-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उत्पादन शुल्क विभागाचा दुय्यम निरिक्षकास बिअर बारच्या नुतनीकरणाच्या प्रकरणात ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना वाई येथील कार्यालयात अटक केली असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१६) :** (१)होय.

(२) याप्रकरणी आरोपी लोकसेवक श्री विलास नामदेव चिखले दुय्यम निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, वाई जि.सातारा यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७,१३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे वाई पोलिस स्टेशनमध्ये दिनांक १८/५/२०१६ रोजी गु.र.नं.९७/२०१६ दाखल करण्यात आला आहे.गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खटाव (जि.सातारा) तालुक्यात मटका, जुगारासह अवैध धंदे सुरु असल्याबाबत

**(४३) ६१६६० (२४-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (जि.सातारा) तालुक्यात मटका, जुगारासह अनेक अवैध धंदे चालविले जात असून याकडे पोलिस अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा तक्रारी येथील नागरीकांनी केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) खटाव (जि.सातारा) तालुक्यात मटका, जुगार हे अवैध धंदे चालू असलेबाबतचे तक्रारी अर्ज प्राप्त झाले आहेत. हे खरे आहे. परंतु पोलीस अधिकारी दुर्लक्ष करीत असलेबाबतच्या तक्रारी प्राप्त नाहीत.

(२) खटाव तालुक्यात वडुज, औंध व पुसेगांव ही तीन पोलीस स्टेशन आहेत. जानेवारी २०१६ पासून, ऑगस्ट २०१६ अखेर पोलीस विभागामार्फत या तीन पोलीस ठाणेंचे हद्दीत अवैध दारुच्या एकूण ४० कसेस करण्यात आल्या असून त्यामध्ये ३५ अरोपींना अटक करुन त्यांचेकडून रु. १,६२,८४०/- इतक्या रकमेचा माल जप्त करण्यात आलेला आहे. अवैध दारु

विकणाऱ्या व्यक्ती विरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच या तीन पोलीस ठाणेचे हद्दीत जुगाराच्या एकुण १९ कसेस करण्यात आल्या असून ७८ अरोपींना अटक करुन त्यांचेकडून ८,२१,११५/- रुपये रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त करण्यात आलेले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईतील फोर्ट येथील मोदी स्ट्रीट इस्फानी बिल्डिगमध्ये राहणा-या मारिया बी उस्मान शेख या महिलेला समाजकंटक धमकी देत असल्याबाबत**

**(४४) ६२२०७ (२३-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील फोर्ट येथील मोदी स्ट्रीट इस्फानी बिल्डिंगमध्ये राहणा-या मारिया बी उस्मान शेख या महिलेचा विनयभंग करुन त्यांना ठार करण्याची धमकी त्याच इमारतीमधील तसेच परिसरात राहणारे काही समाजकंटक देत असल्याबाबत त्यांनी माहे मार्च, २०१६ मध्ये संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार करुनहीअद्याप याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी होऊन गुन्हेगारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :** (१) नाही.
(२) तक्रारदार महिलेने दि.१४.३.२०१६ रोजी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे येथे केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी अंती दि.२३.३.२०१६ रोजी गु.र.क्र.६९/२०१६ कलम ३५४, ४५२, ५०९, ५०६(२) भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असून, गुन्हयाचा तपास पूर्ण करून मा.न्यायालयात (३८ वे न्यायालय, बेलार्ड पिअर, मुंबई-१) दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलोरा (जि.अमरावती) विमानतळाचे विस्तारिकरण तसेच धावपटटीची लांबी वाढविण्याबाबत**

**(४५) ६२४८५ (२३-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयाच्या विकासाकरीता महत्वाच्या असलेल्या बेलोरा येथील विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या कामाला गती मिळण्यासाठी तसेच विमानतळाचे धावपटटीची लांबी वाढविण्याकरिता करोडो रुपयांचा निधी मंजूर करण्यात येवूनही गत सहा महिन्यापासून

प्रत्यक्ष कामाला सुरुता करण्यात आली नसल्याने विस्तारीकरणाचे काम अपुर्णावस्थेत असल्याचे माहे जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्हयाच्या औद्योगिक विकासाच्या दुष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या विमानतळाचे रखडलेले काम गतीमान करुन त्वरीत पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कैंद्र शासनाच्या नागरी विमान वाहतूक धोरण, २०१६ अंतर्गत राज्यामध्ये "Regional connectivity Scheme" योजना राबविण्याचे प्रस्तावित असून याकरीता राज्यामधील १० विमानतळाची निवड केली आहे. त्यामध्ये बेलोरा अमरावती विमानतळाचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन व नागरी विमान वाहतूक मंत्रालय भारत सरकार यांच्यामध्ये याबाबत दि. २३/८/२०१६ रोजी सांमजस्य करार करण्यात आला असून या योजनेंअतर्गत समाविष्ट सर्व विमानतळांच्या विकासाबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्हयातील एनआयसीएल कंपनी सेबीच्या काळ्या यादीत असतांनाही नागरिकांकडून रकमा जमा करीत असल्याबाबत

**(४६) ६२५४३ (२३-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील एनआयसीएल कंपनी सेबीच्या काळ्या यादीत असून आर्थिक व्यवहार करण्यास सक्त मनाई असतानाही कंपनीकडून आरडी, फिक्स डिपॉझिट, इ. रकमा नागरिकांकडून जमा केल्या जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीच्या व्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश मा. पालकमंत्री यांनी माहे मे, २०१६ च्या सुमारास पोलीस अधिक्षक यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदेशानुसार चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे
(३) होय चौकशी केली आहे

सदर प्रकरणी तक्रारदार याचे तक्रारीवरुन एनआयसीएल कंपनीच्या चंद्रपूर येथील व्यवस्थापकाविरुध्द पोलीस स्टेशन, रामनगर येथे अप क्र. ५३२/२०१६ कलम ४२०,४०९ भांदवि

सहकलम ३,४ एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीला अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्हयात राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर अद्ययावतीकरण करण्याबाबत

**(४७) ६२६०१ (२३-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर अद्ययावतीकरण करण्यासाठी जनगणनेच्या माध्यमातून घरोघरी भेटी देऊन सर्वसामान्य निवासींच्या तपशिलाची सत्यता पडताळून डेटाबेस मध्ये आधारकार्डाचे समायोजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असलयास, सदर सामान्य निवासींचे बायेमेट्रीक्स संकलित करण्याचे काम संस्थामार्फत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सर्वसामान्य निवासींच्या तपशिलाची सत्यता पडताळून याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :** (१) होय.
(२) नाही.
(३) सर्वसामान्य निवासींची राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली माहिती संबंधित कुटूंबातील जबाबदार व्यक्तीने सुचविल्याप्रमाणे दुरूस्त्या करून अद्ययावत करण्यात आली आहे. राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अद्ययावतीकरणाच्या पुढील टप्प्यामध्ये राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही सॉफ्टवेअर मध्ये डाटा एन्ट्री करून राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अद्यायावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देशात निर्माण झालेली स्वयमपूर्ण व संपूर्णपणे मोफत असलेली भारत ऑपरेटिंग सिस्टीम असताना परदेशी बनावटीची महागडी सिस्टीमचा वापर करण्याबाबत

**(४८) ६३७२२ (२२-०८-२०१६). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात संगणकासाठी तयार झालेली भारत ऑपरेटिंग सिस्टीम स्वयंपूर्ण असून संपूर्णपणे मोफत असून सुद्धा तसेच सदर पद्धत वापरावी अशी सक्त सूचना देवूनही प्रत्यक्षात माध्यमिक व उच्च शिक्षण विभागात मायक्रोसॉफ्ट ,विंडोज,एम एस ऑफिस या अत्यंत

महागड्या पद्धतीचाच वापर सुरु असून त्यामुळे विद्यार्थ्यांवर विनाकारण आर्थिक बोजा वाढतो आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर सिस्टीम उच्च न्यायालय,सर्वोच्च न्यायालय, केंद्र सरकार काही शासकीय कार्यालयात वापरीत असून राज्यातील शिक्षण विभागच या बाबत मागे असल्याची तक्रार सदर सिस्टीम वापरकर्त्यांनी केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,तदनुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-१२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड (जि.अमरावती) येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालय स्थापन करण्याबाबत**

**(४९) ६४१७८ (२३-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालय स्थापन करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २९ जून, २०१५ वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे

(२) राज्यात जिल्हा व सत्र न्यायालये स्थापन करण्याबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई याचे स्तरावर गठीत The Establishment of Courts Committee या समितीने निर्णय घेतल्यावर त्या अनुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येते वरुड (जि. अमरावती) येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालय स्थापन करणेबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई याचेकडून अद्यापपर्यंत कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हातील देहूरोड, तळेगाव दाभाडे व इतर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यावर कारचाई करण्याबाबत**

**(५०) ६४४०९ (२३-०८-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हातील देहूरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, वडगाव, कामशेत, लोणावळा शहर व ग्रामीण या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गुटखा विक्री, मटका, जुगाराचे

अड्डे सुरु असून महामार्गावर लॉजींगच्या नावावर वेश्या व्यवसाय, काळे तेल भेसळ, अवैध हातभट्टी, देशी व विदेशी दारू विक्री असे अनेक अवैध धंदे राजरोसपणे सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध धंद्यावर पोलीसांकडून कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

पुणे ग्रामीण जिल्ह्यातील लोणावळा व देहूरोड विभागात चोरुन धंदा चालू ठेवणाऱ्याविरुध्द माहीती काढून त्यांचेवर छापे टाकून माहे जून, २०१६ अखेर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र. | तपशील | केसेस | अटक आरोपी | जप्त माल |
|---|---|---|---|---|
| १ | मटका/जुगार | २७ | ८३ | ७६,०२५ |
| २ | अवैध हातभट्टी | ३२ | ३२ | १,२६,५०० |
| ३ | देशी/विदेशी दारु विक्री | ५५ | ५८ | ९०,६६१ |
| ४ | वेश्या व्यवसाय | ४ | २३ | (४ मुलींना मुक्त केले) |
| ५ | काळे तेल भेसळ | ० | ० | ० |
| ६ | गुटखा विक्री | ० | ० | ० |

वरील केसेस मध्ये छापे टाकूनही पुन्हा अवैध दारुधंदे करणाऱ्यावर (१२) केसेस मध्ये मुं. प्रो. का. कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.